# University of Mumbai

क्र.एईएम/आयसीडी/156 /२०२५-२६

परिपत्रक :—

मुंबई विद्यापीठांतर्गत असलेले विभाग तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, संस्था व इतर स्वायत्ता महाविद्यालयांचे विभागप्रमुख, प्राचार्य, संचालक यांना कळविण्यात येत आहे की, विद्यापीठाच्या विविध अधिसूचना व परिपत्रक तसेच प्रशासनाने वेळोवळी घेतलेल्या निर्णयानुसार आपल्या मुंबई विद्यापीठांतर्गत असलेले विभाग तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, संस्था व इतर स्वायत्ता महाविद्यालये येथे सुरु असलेल्या व शिकविल्या जाणा—या अभ्यासक्रमांसाठी शिक्षण शुल्क व इतर शुल्क आकारले जातात.

प्रथम वर्ष २०२५:— २०२६ प्रवेशांकरीता शैक्षणिक शुल्काबाबत प्रवेश, नावनोंदणी, पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभागाचे परीपत्रक क्र. AEM/ICD/138 of 2025 दिनांक १९ मे,२०२५ मधील तक्त्यामधील शुल्क भरणा हे ऑनलाईन पध्दतीने मुंबई विद्यापीठाच्या Samarth-e-Gov पोर्टल द्वारे जमा करणे आवश्यक आहे. (सोबत प्रत जोडत आहे).

तसेच मुंबई विद्यापीठाचे परिपत्रक क्र.वि.क./आयसीसी/पदव्युत्तर २०२४—२५/०२ दिनांक ०२ जुलै, २०२४ नुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडुन पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशावेळी सदर परिपत्रकानुसार शुल्क आकारण्यात यावेत व त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येवू नये. **(सोबत प्रत जोडत आहे)**

तसेच मुंबई विद्यापीठाचे परिपत्र क्र.वि.क./आयसीसी/२०२४—२५/०४ दिनांक २४ जुलै, २०२४ नुसार व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणा—या आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC) तसेच, इतर मागास वर्ग (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करण्यात आलेले आहे. **(सोबत प्रत जोडत आहे)**

(डॉ पुजा रौंदळे)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन विभाग मंडळ

मुंबई- ४०००९८
दिनांक-27/मे, २०२५.